सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १८८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. २ सप्टेंबर २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# शिवसेना पक्ष-चिन्हावर 'सर्वोच्च' सुनावणी

## मूळ विचारधारेच्या विरोधी पक्षांसोबत गेल्यानेच पक्षात फूट

### शिंदे गटाचा जोरदार युक्तिवाद; पुढील सुनावणी १५ सप्टेंबरला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२नवी दिल्ली–** बाळासाहेब ठाकरे यांनीही निवडणूक आयोगाचे अधिकार मान्य केलं होतं. मात्र उद्धव ठाकरेंनी पक्षातील लोकशाही संपवली, असा युक्तिवाद एकनाथ शिंदे गटाचे वकील नीरज किशन कौल यांनी केला. यासह नीरज कौल यांनी शिवसेनाप्रमुख पदाबाबत मोठा धक्कादायक दावा केलाय. शिवासेना पक्ष कोणाच्या याप्रकरणी सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरू आहे. ठाकरे गटाच्या युक्तीवादानंतर आता शिंदे गटाकडून युक्तीवाद केला जातोय. आज झालेल्या सुनावणीत शिंदे गटाने निवडणूक आयोगाच्या निर्णयावर घेण्यात आलेल्या आरोपांवर उत्तर देण्यात आले. आयोगाचे निर्णय कशा पद्धतीने योग्य होते, याचा दावा शिंदे गटाकडून करण्यात आला. बाळासाहेब ठाकरेंनी १९९९ सालची घटना निवडणूक आयोगासमोर आणल्यानंतर निवडणूक आयोगाने त्यामध्ये काही बदल करण्याच्या सूचना केल्या. ते मान्य करत बाळासाहेब ठाकरे यांनी निवडणूक आयोगाचे अधिकार मान्य केले होते. पण २०१८ साली उद्धव ठाकरे यांनी त्या घटनेमध्ये बदल केला, जो अवैध होता. पक्ष घटना योग्य आहे की नाही हे ठरवण्याचा अधिकार हा निवडणूक आयोगाला आहे. त्यामुळेच त्यांनी २०१८ सालची घटना ही योग्य नव्हती, असा निर्णय दिला, असा दावा एकनाथ शिंदे यांच्या वकिलांनी केला.




उद्धव ठाकरेंनी पक्षातील लोकशाही संपवून सर्व अधिकार स्वतःकडे घेण्याचा प्रयत्न केला, त्यानंतर पक्षात असंतोष निर्माण झाला होता. शिवसेनेच्या विचारांच्या विरोधात असलेल्या पक्षाशी युती करण्याचा निर्णय उद्धव ठाकरे यांनी घेतला होता. त्याआधारेच एकनाथ शिंदे यांनी आपलाच पक्ष मूळ शिवसेना असल्याचा दावा केल्याचं वकिलांनी सांगितलं.राजकीय पक्ष कोणता आहे हे ठरवताना विधिमंडळातील आमदारांची संख्या पाहणे गरजेचं असतं हे आधी सर्वोच्च न्यायालयाने सांगितलं आहे. त्यामुळेच शिवसेनेच्या प्रकरणात विधिमंडळातील आमदारांची संख्या निवडणूक आयोगाने लक्षात घेतल्याचा दावाही शिंदे गटाने केलाय. राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष हे दोन वेगवेगळे मुद्दे असले तरी जर राजकीय पक्षात मतभेद असतील तर पक्ष कुणाचा निर्णय हा पक्षाच्या संविधानाच्या आधारे घ्यायचा असतो.

#### शिवसेनाप्रमुख पदावर मोठा दावा

शिवसेनाप्रमुख पद हे २०१३ पर्यंत होतं. पण बाळासाहेब ठाकरेंच्या नंतर हे पद गोठवण्यात आलं. त्यानंतर शिवसेना कार्याध्यक्ष हे पद अस्तित्वात आलं. उद्धव ठाकरे कार्याध्यक्ष असताना शिवसेनेत पक्षांतर्गत निवडणुका झाला नाहीत. निवडणुका घेणयाची जबाबदारी कुणाची होती? या चुका उद्धव ठाकरे यांनी सुधारायला हव्या होत्या, असा युक्तिवाद शिंदेंच्या वकिलांनी केला.

# मोदींचे नेतृत्व मान्य नसेल तर पाकिस्तानात जा!

## अमित ठाकरेंवर शिंदेसेनेचा हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२मुंबई–** भाजप आणि मनसेमधील राजकीय वाद आता अधिकच पेटण्याची चिन्हे दिसत असताना या वादात शिंदेसेनेनेही उडी घेतली आहे. महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष आणि शिंदेसेनेचे नेते सिद्धेश कदम यांनी मनसे नेते अमित ठाकरे यांच्यावर जोरदार टीका करत थेट आक्रमक भूमिका घेतली. मुंबईतील गोरेगाव पूर्वेकडील नेस्को संकुलात प्लास्टिक रिसायकलिंग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन सिद्धेश कदम यांच्या हस्ते झाले. यावेळी माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी अमित ठाकरे यांच्या भूमिकेवर सडकून टीका केली.अमित ठाकरे यांचे हे वर्तन म्हणजे बालिशपणा आहे. कुठेही आक्रमकता दाखवायची आणि




पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशाचे पंतप्रधान आहेत, हे विसरायचे, असा टोला सिद्धेश कदम यांनी लगावला.

पुढे अधिक आक्रमक होत कदम म्हणाले, जगाच्या नकाशावर मोदी साहेबांचा वर्चस्व आहे. तुम्हाला ते मान्य नसेल तर तुम्ही पाकिस्तानमध्ये जा. तुम्ही भारतात कशाला राहता?कदम यांच्या या जहाल वक्तव्यामुळे भाजप-मनसे वादाला आता शिंदेसेनेच्या आक्रमक भूमिकेची फोडणी मिळाली आहे. अमित ठाकरे यांच्या वक्तव्यावरून सुरू झालेला राजकीय संघर्ष आता तीन पक्षांमध्ये रंगण्याची शक्यता निर्माण झाली आहे.सिद्धेश कदम यांच्या पाकिस्तानात जा या वक्तव्यावर मनसेकडून काय प्रतिक्रिया येते, तसेच अमित ठाकरे किंवा मनसेचे वरिष्ठ नेते यावर प्रत्युत्तर देतात का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## ४ महिला, ३ ग्राहक अन् एक पंटर...;

# बंगल्यावर अचानक धाड पडली अन् सगळंच बिंग फुटलं




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२जळगाव –** जळगाव शहरातील रामानंद नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत धक्कादायक प्रकार समोर आलाय. शहरातील पिंप्राळा हुडको परिसरातील एका बंगल्यावर पोलिसांनी धाड टाकली. पोलिसांच्या धाडीनंतर बंगल्यातील प्रकार उघडकीस आला. बंगल्यात सुरू असलेल्या वेश्या व्यवसायावर धडक कारवाई केलीय. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी टाकलेल्या धाडीत ४ पीडित महिलांची सुटका केली आहे. तर ३ आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंप्राळा परिसरातील एका बंगल्यात बेकायदेशीरपणे वेश्या व्यवसाय चालवला जात असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून खात्री केली आणि तात्काळ सदर बंगल्यावर छापा टाकला. या कारवाईदरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून संशयितांना ताब्यात घेतले गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सदर ही कारवाई प्रभारी उप पोलीस अधीक्षक सह्याद्री बिर्ले, रामानंद नगर पोलीस स्टेशचे निरीक्षक मधुकर साळवे याच्या मार्गदर्शना खाली सहाय्यक पोलीस निरीक्षक माधुरी बोरसे, पीएसआय दिनेश बडगुजर,राजेश पाटील, सहाय्यक फौजदार संजय हिवरकय, भूषण कोल्हे,अनिल पाटील,मनिषा पाटील, राखी खाटीक,हे.कॉं. दिपक पाटील,कीरण धनगर, संगपाल तायडे,अमित माळी, रामानंदनगर पोलीस स्टेशन चे जितेंद्र राजपूत ,व जितेंद्र राठोड यांनी केलीय.

# अमरावतीच्या स्वच्छता ठेक्याला न्यायालयीन धक्का; कोणार्क कंपनीला बाद करण्याचा मार्ग मोकळा?

## उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातील सुनावणीनंतर ठेका 'रिकॉल' प्रक्रियेला दिशा

### टेंडरमधील कथित अनियमिततेची चौकशी व दोषींवर कारवाईची नागरिक कृती समितीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती**

अमरावती महानगर पालिकेच्या दैनंदिन साफसफाई व स्वच्छता व्यवस्थेच्या ठेक्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात झालेल्या सुनावणीनंतर महत्त्वपूर्ण घडामोड घडली आहे. स्वच्छता ठेक्याच्या 'रिकॉल' प्रक्रियेला न्यायालयीन सुनावणीतून दिशा मिळाल्याने संबंधित कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला स्वच्छता कामातून बाद करण्याचा मार्ग मोकळा झाल्याचा दावा अमरावती नागरिक कृती समितीच्या वतीने करण्यात आला आहे. न्यायालयाच्या निर्णयानंतर आता कंपनीला बाद करण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करण्याची मागणी जोर धरत आहे.सदर प्रकरणात अमरावती महानगरपालिकेच्या वतीने अ‍ॅड. धर्माधिकारी यांनी बाजू मांडली. तर अ‍ॅड. गिलडा यांनी अमरावती शहरातील स्वच्छतेची गंभीर परिस्थिती, दैनंदिन साफसफाई व्यवस्थेतील त्रुटी तसेच स्वच्छता ठेक्याची निविदा प्रक्रिया कथितपणे नियमबाह्य पद्धतीने राबविण्यात आल्याचे मुद्दे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.शहरातील लाखो नागरिकांच्या आरोग्याशी थेट संबंध असलेल्या स्वच्छता व्यवस्थेमध्ये पारदर्शकता, गुणवत्ता आणि नियमांचे काटेकोर



पालन होणे अत्यावश्यक आहे. निविदा प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची अनियमितता, आर्थिक हितसंबंध किंवा नियमबाह्य निर्णय घेण्यात आले असल्यास त्याची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी नागरिक कृती समितीने केली आहे.या प्रकरणात उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्णयामुळे स्वच्छता ठेक्याबाबत नव्याने कारवाईची शक्यता निर्माण झाली आहे. न्यायालयीन निर्णयाच्या पार्श्वभूमीवर संबंधित कंपनीच्या ठेक्याचे पुनर्विलोकन करून आवश्यक ती प्रक्रिया राबवावी आणि शहरातील स्वच्छता व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी पर्यायी उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे.अमरावती नागरिक कृती समितीच्या वतीने असेही स्पष्ट करण्यात आले आहे की, स्वच्छता ठेक्याच्या निविदा प्रक्रियेत अनियमितता किंवा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्यास संबंधित अधिकारी व जबाबदार व्यक्तींविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करावेत. त्याचबरोबर विभागीय व शासकीय स्तरावर कठोर कारवाई करण्यात यावी.या संदर्भात तत्कालीन महापालिका आयुक्त, तत्कालीन आरोग्य अधिकारी अजय जाधव, संबंधित उपायुक्त, लेखाधिकारी तसेच इतर जबाबदार अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करण्याची मागणी पुढे येत आहे. या प्रकरणात पुढील न्यायालयीन कारवाईसाठी माजी नगरसेवक मुन्ना राठोड व समीर जंजाळ यांच्याकडून जनहित याचिका दाखल करण्याची तयारी सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे. न्यायालयाच्या निर्णयामुळे अमरावतीतील सुमारे आठ लाख नागरिकांना न्याय मिळण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच स्वच्छता व कचरा व्यवस्थापनाच्या ठेक्यात कथितपणे झालेल्या गैरप्रकारांची ही चौकशी होऊन सत्य बाहेर येण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. महानगरपालिकेतील भविष्यातील निविदा प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, नियमबद्ध आणि नागरिकहिताला प्राधान्य देणारी असावी, यासाठी नागरिक कृती समितीच्या वतीने पुढील कायदेशीर लढाई लढण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. नागरिकांच्या करातून जमा होणाऱ्या पैशांचा विनियोग पारदर्शकपणे व्हावा आणि शहराच्या स्वच्छतेशी कोणतीही तडजोड होऊ नये, अशी ठाम भूमिका समितीने मांडली आहे.

# नो -एन्ट्रीत रेती माफियांची मुजोरी!

## बिननंबर ट्रकांचा साईनगर ते भातकुली मार्गावर सुसाट वेग

### प्रशासनाचे दुर्लक्ष कधीपर्यंत?, राजापेठ दुर्घटना विसरले का प्रशासन?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती :** शहरातील नो-एन्ट्रीच्या नियमांना अक्षरशः केराची टोपली दाखवत रेती वाहतूक करणारे ट्रक बिनधास्तपणे रस्त्यावर धावत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. साईनगर कमानपासून अकोली मार्गे भातकुलीकडे दररोज सकाळच्या वेळेत मोठ्या प्रमाणात रेतीचे ट्रक नो-एन्ट्री असतानाही सुसाट धावत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. विशेष म्हणजे, या ट्रकमधील काही वाहने क्रमांकफलकाविनाच रस्त्यावर धावत असल्याचे सांगण्यात येत असून, हा प्रकार वाहतूक पोलिसांसह संबंधित प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे.शहरात जड




वाहनांसाठी नो-एन्ट्रीचे नियम असताना रेतीने भरलेले ट्रक कोणाच्या आशीर्वादाने शहरातून धावत आहेत, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. वाहतुकीची कोंडी, अपघाताचा धोका आणि नागरिकांच्या जीविताला निर्माण होणारा धोका याकडे संबंधित यंत्रणा जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे का, अशीही चर्चा सुरू आहे.गेल्या एक ते दीड महिन्यांपूर्वी राजापेठ उड्डाणपुलावर अशाच एका बिननंबरच्या ट्रकने दोन महिलांना चिरडल्याची दुर्दैवी घटना घडली होती. या घटनेनंतर काही दिवस पोलिस प्रशासनाने शहरात ट्रकची तपासणी आणि नाकाबंदी मोहीम राबविली. मात्र, कालांतराने ही कारवाई थंडावल्याचे चित्र असून, आता पुन्हा नो-एन्ट्रीच्या वेळेत रेतीचे ट्रक खुलेआम धावत आहेत.एखादा आणखी भीषण अपघात झाल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का? बिननंबर वाहने कोणत्या परवानगीवर रस्त्यावर धावत आहेत? नो-एन्ट्रीचे नियम सर्वसामान्यांसाठीच आहेत का? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.पोलीस आणि वाहतूक विभागाने तातडीने या मार्गावर विशेष नाकाबंदी करून नो-एन्ट्रीत धावणाऱ्या तसेच बिननंबरच्या ट्रकांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे पुन्हा एखाद्या निष्पापाचा जीव गेल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा संतप्त सवाल उपस्थित झाला आहे.



## संपादकीय ......

# दरवाढ खतांची, कोंडी शेतकऱ्यांची!

शेतकऱ्यांसमोर खतांच्या वाढत्या किमतीचे नवे संकट उभे राहिले आहे. उत्पादन वाढविण्याचा खर्चच वाढत राहिला, तर शेतीमालाला मिळणारे उत्पन्न कितीही वाढले, तरी शेतकऱ्याच्या हातात प्रत्यक्ष नफा किती उरणार, हा मूलभूत प्रश्न आहे.

बियाणे, मजुरी, यंत्रसामग्री, इंधन, कीटकनाशके आणि रासायनिक खते यांच्या किमती सातत्याने वाढत असताना शेतीमालाच्या भावात त्याच प्रमाणात वाढ होत नाही. यंदाच्या खरीप हंगामाच्या तोंडावर रासायनिक खतांच्या किमतीत झालेली वाढ म्हणूनच चिंतेची आहे. काही खतांच्या दरात पोत्यामागे ५० ते १४०० रुपयांपर्यंत वाढ झाली आहे. पाऊस समाधानकारक झाला, तरी शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर आनंद दिसेलच, याची खात्री त्यामुळे उरलेली नाही. खरीप हंगामात सोयाबीन, कापूस, मका, तूर आणि अन्य पिकांसाठी मोठ्या प्रमाणावर खतांची गरज भासते. पेरणीपूर्व मशागत, बियाणे आणि मजुरीचा खर्च करून शेतकरी आधीच मोठी रक्कम गुंतवतो. त्यात खतांच्या वाढलेल्या किमतीची भर पडली की, १ एकरामागील उत्पादन खर्चाचा हिशेब बिघडतो. उपलब्ध माहितीनुसार युरियाचे ५० किलोचे पोते २०२५ आणि २०२६ मध्ये २६६ रुपयांवर, तर डीएपी १३५० रुपयांवर कायम आहे; मात्र इतर अनेक खतांच्या किमती वाढल्या आहेत.अमोनियम सल्फेटचे पोते २०२५ मधील ९०० रुपयांवरून २०२६ मध्ये १४०० रुपयांवर गेले आहे. २०:२०:०:१३ या खताचा दर १२५० रुपयांवरून २३५० रुपये झाला. १०:२६:२६ चा दर १८०० रुपयांवरून २१५० रुपये, तर ९:२४:२४ चा दर १५५० रुपयांवरून २६०० रुपये झाला. १२:३२:१६ खत १८०० रुपयांवरून २५४० रुपयांवर गेले. २४:२४:० चा दर १७०० रुपयांवरून २८०० रुपये म्हणजे तब्बल १००० रुपयांनी वाढला आहे. सुपर फॉस्फेटमध्ये ११० रुपये, एमओपी पोटॅशमध्ये ४५० रुपये, मॅग्नेशियम सल्फेटमध्ये २५० रुपये, गंधकाच्या १० किलो पॅकमध्ये ३०० रुपये, तर कॉम्बो खतामध्ये तब्बल १४०० रुपयांची वाढ झाल्याचे चित्र आहे. एका पोत्यामागील ही वाढ असली, तरी संपूर्ण हंगामातील गरज लक्षात घेतल्यास शेतकऱ्याच्या खिशावर हजारो रुपयांचा अतिरिक्त भार पडणार आहे.

यामागे जागतिक बाजारातील परिस्थितीचाही वाटा आहे. रासायनिक खतांसाठी लागणारा कच्चा माल भारताला मोठ्या प्रमाणावर आयात करावा लागतो. रशिया, चीन, बेलारूस यांसारख्या देशांतून होणारा पुरवठा, आंतरराष्ट्रीय बाजारातील दर, वाहतूक खर्च आणि जागतिक संघर्ष यांचा परिणाम देशांतर्गत खतांच्या किमतींवर होतो; मात्र या जागतिक अर्थकारणाचा अंतिम फटका शेतकऱ्याच्या बांधावर बसतो. शेतकऱ्याने आंतरराष्ट्रीय अस्थिरतेची किंमत किती काळ मोजायची? खर्च परवडत नसल्याने शेतकरी शिफारस केलेल्या प्रमाणापेक्षा कमी खत वापरू लागला, तर त्याचा थेट परिणाम उत्पादनावर होऊ शकतो. दुसरीकडे, तुलनेने स्वस्त पर्याय म्हणून अयोग्य किंवा असंतुलित खतांचा वापर वाढला, तर जमिनीच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो.

केंद्र सरकार खतांवर मोठ्या प्रमाणावर अनुदान देते. त्यामागील उद्देश शेतकऱ्यांना परवडणाऱ्या दरात खते उपलब्ध करून देणे हाच आहे. मग, बाजारात विविध खतांच्या किमतीत ५०, २५०, ५००, ११०० किंवा अगदी १४०० रुपयांची वाढ होत असेल, तर अनुदानाचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यापर्यंत किती पोहोचतो, याचा हिशेब मांडला पाहिजे. अनुदान वाढविणे हा कायमस्वरूपी उपाय ठरणार नाही. खतांच्या कच्च्या मालासाठी भारताचे परदेशावरील अवलंबित्व कमी करणे, देशांतर्गत उत्पादन वाढविणे, दीर्घकालीन आयात करार करणे आणि खरीप-रब्बी हंगामाच्या आधी पुरेसा साठा तयार ठेवणे गरजेचे आहे. त्याचबरोबर माती परीक्षणाच्या आधारे खतांचा संतुलित वापर, सेंद्रिय घटकांचा अधिक उपयोग आणि पिकानुसार अचूक मार्गदर्शन यावर भर दिला पाहिजे.

प्रत्येक जिल्ह्यात खतांची उपलब्धता आणि प्रत्यक्ष विक्री दर यांचे निरीक्षण, कृत्रिम टंचाई व जादा दराने विक्रीवर कारवाई आणि गरजेनुसार शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा देणे आवश्यक आहे. आज जागतिक बाजारात अस्थिरता निर्माण झाली की, त्याचे पडसाद काही काळात शेतकऱ्याच्या उत्पादन खर्चात उमटतात. ही साखळी तोडण्यासाठी देशांतर्गत खतनिर्मिती आणि कच्च्या मालाची उपलब्धता वाढविणे, आयातीचे स्रोत विविध करणे आणि हंगामापूर्वी पुरेसा साठा करणे आवश्यक आहे. शेतकऱ्याला दरवाढीनंतर भरपाई देण्यापेक्षा त्याचा उत्पादन खर्च अनियंत्रित वाढणार नाही अशी व्यवस्था निर्माण करणे अधिक शहाणपणाचे ठरेल. शेतीचे उत्पन्न वाढविण्याची भाषा अर्थपूर्ण व्हायची असेल, तर प्रथम शेतीचा खर्च आवाक्यात ठेवावा लागेल.

# अमरावती राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालयात सेवा मिळणे हा नागरिकांचा कायदेशीर हक्क

## माहिती फलकाचे मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

नागरिकांना शासकीय सेवा विहित कालावधीत, पारदर्शक आणि कार्यक्षम पद्धतीने मिळाव्यात, यासाठी लागू करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५' या कायद्याची व्यापक जनजागृती करण्याच्या उद्देशाने राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग यांच्या वतीने तयार करण्यात आलेल्या माहिती फलकाचे लोकार्पण अमरावती परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ.महेश पाटील आणि राज्य सेवा हक्क आयुक्त अरुण डोंगरे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मान्यवरांनी लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी ही पारदर्शक प्रशासन आणि सुशासनासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन केले.



कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात आलेल्या या माहिती फलकामध्ये नागरिकांना शासकीय सेवा मिळविण्याची संपूर्ण प्रक्रिया फ्लोचार्टच्या माध्यमातून सोप्या व सुटसुटीत पद्धतीने समजावून सांगण्यात आली आहे. पात्र व्यक्तीने अर्ज केल्यानंतर सेवा नाकारली गेल्यास किंवा विहित कालावधीत सेवा मिळाली नाही, तर संबंधित व्यक्तीस ३० दिवसांच्या आत प्रथम अपील दाखल करता येते. प्रथम अपीलीय प्राधिकार्याच्या निर्णयावर समाधान न झाल्यास पुढील ३० दिवसांत द्वितीय अपील, तर त्यानंतर ६० दिवसांच्या आत तृतीय अपील राज्य सेवा हक्क आयोगाकडे दाखल करण्याची तरतूद आहे.

शासकीय सेवा देण्यास विनाकारण विलंब करणार्या अथवा सेवा नाकारणार्या पदनिर्देशित अधिकार्यावर रु. ५०० ते रु. ५ हजारांपर्यंत दंड आकारण्याची तरतूद या कायद्यात आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्या हक्कांबाबत जागरूक राहून कायद्याचा प्रभावीपणे वापर करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. सेवा मिळणे हा नागरिकांचा कायदेशीर हक्क असून, सेवा देणे ही केवळ शासकीय यंत्रणेची जबाबदारी नसून कायदेशीर कर्तव्य आहे, हा संदेश यावेळी अधोरेखित करण्यात आला.

जातप्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, विविध परवाने तसेच शासकीय मंजुरी यांसह अनेक सेवा 'आपले सरकार' पोर्टलद्वारे नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. राज्यसेवा हक्क आयुक्त कार्यालय अमरावतीच्या वतीने जुलै महिन्यात 'लोकसेवा हक्क कायदा' या माहिती पुस्तिकेचे मुख्य राज्य सेवा हक्क आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव यांच्या हस्ते मुंबई येथे विमोचन करण्यात आले आहे.या कार्यक्रमास विभागीय आयुक्त कार्यालयाचे अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) संजय जाधव, अपर आयुक्त (महसूल) अनिल खंडागळे, उपजिल्हाधिकारी विवेकानंद काळकर, राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालयाचे उपसचिव (प्र.) देवेंद्र चव्हाण, कक्ष अधिकारी क्षितिज लेंडे, सहायक कक्ष अधिकारी द्विपाल वानखडे, महसूल सहायक सुजित सरोदे व प्रिती शिंगाडे यांच्यासह राज्य सेवा हक्क आयोग व विभागीय आयुक्त कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# चांदूर रेल्वे बसस्थानक स्वच्छतेत सरस प्रवाशांकडून व्यवस्थापनाचे कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२चांदूर रेल्वे :**




सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता हा नेहमीच चर्चेचा विषय असतो. अनेक बसस्थानके, सार्वजनिक शौचालये व बाथरूममध्ये अस्वच्छतेचा अनुभव प्रवाशांना येत असताना, चांदूर रेल्वे येथील बसस्थानक मात्र स्वच्छतेच्या बाबतीत वेगळी ओळख निर्माण करताना दिसत आहे. बसस्थानक परिसर, सार्वजनिक शौचालये व बाथरूमची नियमित स्वच्छता केली जात असल्याने प्रवाशांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.१ जून २०२६ पासून स्मार्ट सर्व्हिसेस, पुणे यांच्या माध्यमातून चांदूर रेल्वे बसस्थानकातील स्वच्छता व्यवस्थापनाची जबाबदारी सुरू करण्यात आली. त्यानंतर बसस्थानक परिसर अधिक स्वच्छ, नीटनेटका आणि प्रवाशांसाठी सुविधाजनक झाल्याचे चित्र दिसून येत आहे. दैनंदिन तसेच साप्ताहिक स्वच्छता नियोजनबद्ध पद्धतीने केली जात असून, उपलब्ध आधुनिक यंत्रसामग्रीच्या माध्यमातून परिसराची स्वच्छता राखण्यावर भर दिला जात आहे.वर्दळीच्या बसस्थानकात स्वच्छतागृहे, बाथरूम आणि परिसराची स्वच्छता सातत्याने राखणे हे मोठे आव्हान असते. मात्र, योग्य नियोजन आणि नियमित देखरेखीमुळे चांदूर रेल्वे बसस्थानकात सकारात्मक बदल घडून आल्याचे नियमित प्रवासी सांगतात.आगार व्यवस्थापक जयंत झाडे, बसस्थानक प्रमुख निलेश भगत तसेच स्मार्ट सर्व्हिसेसचे पर्यवेक्षक अमोल भारसाकळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता कर्मचारी पंकज गिरपुंजे, अर्चना तडस, प्रमिला बोराटकर तसेच बस स्वच्छता कर्मचारी सौरभ पाटील, ज्ञानेश्वर देशमुख आणि गोपाल टेले हे आपली जबाबदारी पार पाडत आहेत. त्यांच्या नियमित प्रयत्नांमुळे बसस्थानकातील प्रवाशांना स्वच्छ आणि प्रसन्न वातावरण मिळत आहे.पाथरगाव येथील प्रवासी अमोल दुधाट यांनी सांगितले की, पूर्वीच्या तुलनेत आता चांदूर रेल्वे बसस्थानक परिसर अधिक स्वच्छ आणि नीटनेटका दिसून येतो. बसस्थानकासारख्या वर्दळीच्या ठिकाणी स्वच्छतागृह, बाथरूम आणि परिसराची नियमित स्वच्छता राखली जात असल्यास त्याचे निश्चितच कौतुक केले पाहिजे. स्वच्छतेत झालेली ही सकारात्मक सुधारणा स्वागतार्ह असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.दरम्यान, आगार व्यवस्थापक जयंत झाडे यांनी सांगितले की, १ जूनपासून स्मार्ट सर्व्हिसेसकडे स्वच्छता व्यवस्थापनाची जबाबदारी देण्यात आली असून, त्यांच्या कामकाजाबाबत प्रवाशांकडून समाधान व्यक्त केले जात आहे. परिसर अधिक स्वच्छ, सुंदर आणि दर्जेदार कसा राहील, यावर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# उद्या तीन सप्टेंबरपासून कृषी विभागात लेखणीबंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ अमरावती –** कृषी विभागाच्या प्रस्तावित आकृतिबंधाविरोधात महाराष्ट्र राज्य कृषिसेवा महासंघाने आंदोलन तीव्र केले आहे. शेतकरी तसेच तांत्रिक संवर्गातील अधिकारी-कर्मचार्यांच्या हितावर परिणाम करणारा हा आकृतिबंध रद्द करण्याच्या मागणीसाठी आंदोलनाचा दुसरा टप्पा सुरू करण्यात आला आहे. या आंदोलनांतर्गत कृषी अधिकारी व कर्मचारी शासकीय व्हॉट्सॲप गटांमधून बाहेर पडत असून, मागण्या मान्य न झाल्यास २१ सप्टेंबरपासून बेमुदत कामबंद आंदोलन करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.




कृषी विभागाच्या प्रस्तावित आकृतिबंधामुळे विभागातील तांत्रिक मनुष्यबळाच्या कामकाजावर परिणाम होणार असल्याचा संघटनांचा मुख्य आक्षेप आहे. यासंदर्भात १५ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे प्रस्तावित आकृतिबंधास विरोध नोंदविण्यात आला होता. त्यानंतर २४ ऑगस्ट रोजी अधिकारी व कर्मचार्यांनी काळ्या फिती लावून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मात्र, याबाबत कोणताही निर्णय न झाल्याने आंदोलन अधिक तीव्र करण्यासंदर्भात पुढील दिशा निश्चित करण्यात आली. आंदोलनाच्या दुसर्या टप्प्यात २८ ऑगस्ट रोजी 'गांधीगिरी' पद्धतीने अधिकारी व कर्मचार्यांनी रात्री उशिरापर्यंत काम करून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आंदोलनाचा पुढील टप्पा जाहीर करण्यात आला आहे.

यानुसार तीन सप्टेंबर रोजी लेखणीबंद आंदोलन करण्यात येणार आहे. त्यानंतर सात सप्टेंबर रोजी सामूहिक रजा घेऊन कृषी आयुक्तालयासमोर राज्यातील सर्व अधिकारी, कर्मचारी धरणे व लक्षवेध आंदोलन करणार आहेत. नऊ सप्टेंबरपासून शासनाच्या सर्व प्लिकेशन्सवर संपूर्ण बहिष्कार टाकण्यात येणार आहे. ११ सप्टेंबर रोजी लॅपटॉप जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानंतर १५ ते १८ सप्टेंबरदरम्यान शासकीय सभा तसेच ऑनलाइन कामावर बहिष्कार टाकण्यात येणार आहे. यासर्व टप्प्यांनंतरही शासनाने आंदोलनाची दखल घेतली नाही, तर २१ सप्टेंबरपासून बेमुदत कामबंद आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशारा संघटनांनी दिला आहे. राज्य सहायक कृषी अधिकारी संघटना, राज्य उपकृषी अधिकारी संघटना, राज्य कृषी अधिकारी संघटना, कृषी सेवा वर्ग दोन राजपत्रित अधिकारी कल्याणकारी संघटना, राज्य कृषी सेवा राजपत्रित अधिकारी संघटना तसेच कृषी सहसंचालक संघटनेचे पदाधिकारी या आंदोलनात सहभागी झाले आहेत. काय आहेत मागण्या? कृषी विभागाचा प्रस्तावित आकृतिबंध तत्काळ स्थगित करून तो रद्द करण्यात यावा तसेच नव्याने तज्ज्ञ समिती गठित करण्यात यावी, भविष्यातील कृषी क्षेत्राच्या गरजांचा विचार करून सुधारित आकृतिबंध तयार करण्यात यावा, प्रत्यक्ष कार्यभार, शेतकर्यांची संख्या, भौगोलिक क्षेत्र, योजनांची संख्या तसेच क्षेत्रीय जबाबदार्या यांचा सखोल अभ्यास करण्यात यावा, तसेच रिक्त मनुष्यबळाचा आढावा घेऊन क्षेत्रीय यंत्रणा सक्षम करण्यात यावी. पर्यवेक्षणाची साखळी, शेतकरी सेवा आणि वाढत्या योजनांचा विचार करून पदांची रचना निश्चित करण्यात यावी.

# हिरव्या मिरचीचे भाव गडगडले

## समतोल व रोगराईमुक्त वातावरणामुळे उत्पादन व आवक वाढल्याचा परिणाम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ वरुड –** नगदी उत्पन्न देणार्या इतर पिकांच्या तुलनेत हिरव्या मिरचीचे उत्पादन शेतकर्यांसाठी फायदेशीर मानले जाते. मात्र, मागील वर्षी प्रति क्विंटल चार ते साडेचार हजार रुपये दर मिळालेल्या हिरव्या मिरचीचे भाव यंदा अर्ध्यावर आले आहेत. समतोल व रोगराईमुक्त वातावरणामुळे उत्पादनात वाढ झाली असून बाजारपेठेतील आवक वाढल्याचा परिणाम मिरचीच्या दरावर झाल्याचे शेतकर्यांचे म्हणणे आहे. दरवर्षी पथ्रोट परिसरातील सुमारे पाच टक्के शेतकरी मिरचीचे उत्पादन घेतात. एकरी सुमारे ५५ हजार रुपये खर्च करून जून महिन्यात मिरचीची लागवड केली जाते. लागवडीनंतर साधारणतः ७० दिवसांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर उत्पादन सुरू होते. सध्या एकरी सुमारे २० क्विंटलपर्यंत मिरचीचे उत्पादन मिळत असून, प्रति क्विंटल सुमारे २, ८०० रुपये दर मिळत आहे. मागील वर्षी मिरचीला चार ते साडेचार हजार रुपयांपर्यंत दर मिळाला होता. यंदा पावसाचे प्रमाण कमी असल्याने मिरची पिकावर रोगराईचा प्रभाव कमी असून उत्पादनात वाढ झाली आहे. पथ्रोट परिसरात यंदा केवळ एक टक्क्याच्या आसपास शेतकर्यांनी मिरचीची लागवड केली आहे. मात्र, बुलडाणा व नंदूरबारसारख्या भागांत मोठ्या प्रमाणात मिरचीचे उत्पादन होत असून ते बाजारपेठेत विक्रीसाठी येत आहे. त्यामुळे बाजारातील आवक वाढून मिरचीच्या दरात घसरण झाली आहे. मिरची पिकाला योग्य वेळी खत देणे, आवश्यकतेनुसार औषधांची फवारणी करणे आणि पिकाची योग्य निगा राखणे आवश्यक असते. योग्य काळजी घेतल्यास पिकाला वारंवार मिरची लागण्याचे प्रमाण कायम राहते. एकसारखे उत्पादन मिळत असताना बाजारपेठेतील आवक व दर निश्चितीचा विचार करून काही शेतकरी हिरव्या मिरचीऐवजी लाल मिरचीचे उत्पादन घेण्यास सुरवात करतात. लाल मिरचीला मागणीनुसार चांगला दर मिळत असल्याने शेतकर्यांच्या उत्पन्नाला आधार मिळतो. दैनंदिन खाद्यपदार्थांमध्ये मिरचीचे महत्त्वाचे स्थान असल्याने बाजारपेठेत तिची मागणी कायम असते. स्थानिक शेतकरी आता मसाला पिकांच्या उत्पादनाकडे वळत असून कडधान्य व इतर पिकांच्या तुलनेत कमी कालावधीत अधिक उत्पादन व चांगला नफा मिळत असल्याने मिरची उत्पादक शेतकरी या उत्पादनातून समाधानी असल्याचे चित्र आहे.

# वाढदिवसाचा सामाजिक उपक्रम : मधुबन वृद्धाश्रमात ब्लँकेट वाटप

## गरजूंना मदत करण्यातूनच वाढदिवसाचा खरा आनंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती :** शिवसेना जिल्हाप्रमुख आशिष धर्माळे यांच्या वाढदिवसानिमित्त मधुबन वृद्धाश्रम येथे सामाजिक बांधिलकी जपत वृद्ध नागरिकांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.वाढदिवस हा केवळ उत्सव आणि आनंद साजरा करण्यापुरता मर्यादित न ठेवता समाजातील गरजू, निराधार आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सेवेसाठी साजरा व्हावा, या उद्देशाने हा सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आला.



वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना ब्लँकेटचे वाटप करून त्यांच्याप्रती आपुलकी, सन्मान आणि सेवाभाव व्यक्त करण्यात आला.

यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वृद्ध नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. समाजातील गरजू आणि वंचित घटकांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करणे, हीच खरी सामाजिक सेवा असून अशा उपक्रमांतून वाढदिवस साजरा करणे हीच खरी समाधानाची बाब आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.समाजातील प्रत्येक सक्षम नागरिकाने गरजू, निराधार आणि ज्येष्ठ नागरिकांच्या मदतीसाठी पुढाकार घेतला पाहिजे. सामाजिक कार्यातून माणुसकी, आपुलकी आणि परस्पर सहकार्याची भावना अधिक मजबूत होत असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.या प्रसंगी अमरावती तालुकाप्रमुख दिलीप ठाकरे, उपतालुकाप्रमुख विनोद अर्मळ, आशिष दारोकार, बशीर भाई, तंटामुक्ती अध्यक्ष एऐजाजभाई, कार्तिक गजबिये, अक्षय सूर्यवंशी, प्रवीण ऊके, शंतनू ठाकरे, रविभाऊ काळबांडे, विद्यासागर होले, अंकुश धर्माळे, सौरभ विचुरकर, सनी मोहोळ, बालाजी प्रयाल, मुकद्दर पठाण, गुरुदेव गटरी, राजू घाटी शैलेश कालबांडे,आदींची उपस्थिती होती.

# जिल्हा परिषदेला पहिल्या टप्यात मिळाले २४२ शिक्षक

## मराठी माध्यमाचे १९४, उर्दूचे ३६ तर माध्यमिकचे १२ शिक्षक; मेळघाटात १८४ नियुक्त्या, २५६ पदे अद्याप रिक्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ अमरावती–** पवित्र पोर्टलच्या माध्यमातून सुरू असलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यात अमरावती जिल्हा परिषदेला २४२ शिक्षक मिळाले आहेत. यामध्ये १९४ मराठी माध्यमाचे, ३६ उर्दू माध्यमाचे आणि १२ माध्यमिक शिक्षकांचा समावेश आहे. विशेष म्हणजे मेळघाटातील शाळांसाठी यापैकी १८४ शिक्षकांची नियुक्ती झाली आहे. मात्र, अपेक्षित ४४० जागांच्या तुलनेत ही संख्या कमी असल्याने मेळघाटातील तब्बल २५६ पदे अद्याप रिक्त राहिली आहेत.राज्यात पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षक भरतीची प्रक्रिया सुरू असून नुकतीच निवड यादी जाहीर करण्यात आली. या भरतीमुळे शिक्षकांची रिक्त पदे भरण्याला काही प्रमाणात दिलासा मिळाला असला तरी मेळघाटातील शिक्षकांची कमतरता अद्याप कायम आहे. दुर्गम आणि आदिवासी भागातील शाळांमध्ये आधीच शिक्षकांची टंचाई असताना अपेक्षेच्या तुलनेत कमी नियुक्त्या झाल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.पवित्र पोर्टलच्या माध्यमातून गुणवत्तेच्या आधारे आणि संगणकीय प्रणालीद्वारे शिक्षक भरती केली जात असल्याचे शासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. राज्यात १३ हजारांहून अधिक शिक्षकांची नियुक्ती झाली असताना अमरावती जिल्हा परिषदेला २४२ शिक्षक मिळाले आहेत. जिल्ह्यात शिक्षकांची साडेपाचशेहून अधिक पदे रिक्त असल्याची माहिती असून, पहिल्या टप्प्यातील नियुक्त्यांनंतरही तीनशेहून अधिक पदे रिक्त राहण्याची शक्यता आहे.

# राज्य नाट्य स्पर्धेच्या नियमावलीत महत्त्वपूर्ण सुधारणा

## स्थानिक हौशी कलाकारांना अधिक संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ अमरावती** महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवांतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या हौशी नाट्य स्पर्धांमध्ये स्थानिक कलाकारांना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभागाने स्पर्धेच्या नियमावलीत महत्त्वपूर्ण सुधारणा केली आहे. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य ड. आशिष शेलार यांच्या निर्देशानुसार घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे स्थानिक हौशी कलाकारांचे स्पर्धेतील हक्काचे व्यासपीठ अधिक सक्षम होणार आहे.महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवांतर्गत हौशी मराठी, हिंदी, संगीत, संस्कृत, बालनाट्य तसेच दिव्यांग बालनाट्य स्पर्धांचे आयोजन राज्यातील २४ केंद्रांवर करण्यात येते. नव्याने करण्यात आलेल्या नियमावलीतील सुधारणेनुसार, स्पर्धेत सहभागी होणारा कलाकार संबंधित स्पर्धा केंद्राच्या जिल्ह्यातील स्थानिक रहिवासी असणे बंधनकारक करण्यात आले आहे.गेल्या काही वर्षांत शासनाने हौशी नाट्य स्पर्धांमधील पारितोषिकांच्या रकमेत लक्षणीय वाढ केली आहे. त्यानंतर काही ठिकाणी परजिल्ह्यातील कलाकार स्थानिक नाट्यसंस्थांच्या माध्यमातून अन्य केंद्रांवर सहभागी होत असल्याच्या तक्रारी सांस्कृतिक कार्य




विभागाकडे प्राप्त झाल्या होत्या. परिणामी, संबंधित जिल्ह्यातील स्थानिक हौशी कलाकारांच्या सहभागाच्या संधींवर मर्यादा येत असल्याचे निदर्शनास आले होते.

या संदर्भात हौशी कलाकार व हौशी नाट्यसंस्थांकडून प्राप्त झालेल्या सूचना आणि तक्रारींची दखल घेऊन मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य ड. आशिष शेलार यांनी स्थानिक कलाकारांच्या हिताला प्राधान्य देत स्पर्धेच्या नियमावलीत आवश्यक सुधारणा करण्याचा निर्णय घेतला.या निर्णयामागे ग्रामीण व शहरी भागांतील स्थानिक नाट्यसंस्थांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे, स्थानिक कलाकारांना स्पर्धांमध्ये अधिक संधी मिळवून देणे तसेच नवोदित हौशी कलाकारांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे, हा प्रमुख उद्देश आहे.सांस्कृतिक कार्य विभागाच्या या निर्णयामुळे राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये कार्यरत असलेल्या हौशी नाट्यसंस्था व स्थानिक कलाकारांना अधिक व्यापक संधी उपलब्ध होणार असून, हौशी रंगभूमीच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे.राज्य नाट्य स्पर्धेसाठीच्या प्रवेशिका दि. २५ सप्टेंबर, २०२६ पर्यंत ारहरपर्रीूरीरिवहर.लो या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. राज्यातील जास्तीत जास्त हौशी कलाकार व हौशी नाट्यसंस्थांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालक श्री. प्रशांत खेडेकर यांनी केले आहे. आपल्या अमरावती जिल्ह्यातील जास्तीत जास्त संस्थानी या स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष ड. चंद्रशेखर डोरले यांनी केले आहे.

# मुंबई-अमरावती विमानसेवा ४ ऑक्टोबरपासून पुन्हा पाच दिवस

## प्रवाशांना दिलासा : वेळेत बदल नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती-** अलायन्स एअर कंपनीची मुंबई-अमरावती-मुंबई ही विमानसेवा पुन्हा एकदा आठवड्यातून पाच दिवस सुरू होणार आहे, पण त्यासाठी प्रवाशांना महिनाभर प्रतीक्षा करावी ब्लागणार आहे. येत्या ४ ऑक्टोबरपासून दर आठवड्याला नाच दिवस ही सेवा उपलब्ध होऊ शकेल.अमरावतीच्या बेलोरा येथील विमानतळावरून मुंबई -अमरावती विमानसेवा १६ एप्रिल २०२५ पासून झाली होती. ही सेवा सुरूवातीला आठवड्यातून चार दिवस होती. पण, मे २०२६ पासून विमानसेवा चार वरून पाच दिवस करण्यात आली. या विमानसेवेला प्रवाशांचा प्रतिसाद आहे. पण, ही सेवा पुरवणाऱ्याअलायन्स एअर कंपनीने 'ऑपरेशनल' कारण दर्शवून ही सेवा पुन्हा चार दिवस करण्याचा निर्णय घेतला होता. हा बदल २५ ऑगस्टपासून झाला. सध्या दर आठवड्याला रविवार, सोमवार, बुधवार आणि शुक्रवार असे चार दिवस मुंबई-अमरावती-मुंबई ही विमानसेवा सुरू आहे. ४ ऑक्टोबरपासून दर रविवार,




सोमवार, मंगळवार, बुधवार आणि शुक्रवार असे पाच दिवस विमानसेवा उपलब्ध राहणार आहे. विमानाच्या वेळेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. मुंबई विमानतळावरून सकाळी ७.०५ वाजता विमान उड्डाण घेते आणि सकाळी ८.५० वाजता अमरावती विमानतळावर पोहचते. तर परतीच्या वेळी अमरावती विमानतळावरून सकाळी ९.१५ वाजता विमानोड्डाण होते आणि सकाळी ११ वाजता मुंबई विमानतळावर पोहचते.

# अंजनगाव सुर्जीत बेपत्ता होणाऱ्या जनावरांमुळे संशयाचे सावट; चौकशीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अंजनगाव सुर्जी-** अंजनगाव सुर्जी शहरात मोकाट फिरणाऱ्या गोवंशीय जनावरांच्या संख्येत अचानक होत असलेल्या घटेमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. काही दिवसांपूर्वी रस्त्यांवर मोठ्या संख्येने दिसणारी जनावरे अचानक गायब होत असल्याचा दावा स्थानिक नागरिकांकडून केला जात असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठ, महामार्गालगतचे रस्ते आणि वसाहती परिसरात कायम वावरणारी अनेक जनावरे अलिकडच्या काळात दिसेनाशी झाली आहेत. ही जनावरे नेमकी कुठे जात आहेत, त्यांची विल्हेवाट कशी लावली जाते किंवा त्यांची



वाहतूक कोण करत आहे, याबाबत प्रशासनाकडे स्पष्ट माहिती उपलब्ध आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

काही नागरिकांनी शहरात दलालांचे जाळे सक्रिय असल्याचा आरोप केला आहे. तसेच काही व्यक्ती स्वतः नियमित पशुपालक नसतानाही गोवंशीय जनावरे पाळून नंतर ती शहरात मोकाट सोडतात, असा दावाही केला जात आहे. मात्र, या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नसून, त्याची सत्यता तपासणे आवश्यक आहे.यामुळे अनेक गंभीर प्रश्न समोर येत आहेत. शहरातील मोकाट जनावरांची अधिकृत नोंद आहे का? त्यांना ओळख पटविण्यासाठी टॅगिंग करण्यात आले आहे का? जनावरे पकडल्यास त्यांची नोंद कुठे केली जाते? गोशाळांमध्ये किती जनावरे दाखल झाली आहेत? संबंधित विभागांकडे याची अद्ययावत माहिती आहे का? अशा प्रश्नांची उत्तरे नागरिक मागत आहेत.शहरातील मोकाट जनावरांमुळे वाहतूक कोंडी, अपघात, पिकांचे नुकसान आणि अस्वच्छतेच्या तक्रारी सातत्याने होत असतानाही या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना का होत नाहीत, याबाबतही नागरिकांमध्ये नाराजी आहे. जर जनावरे खरोखरच गहाळ होत असतील, तर त्यामागे निष्काळजीपणा आहे की संघटित गैरप्रकार, याची निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे.नागरिकांनी पोलिस प्रशासन, पशुसंवर्धन विभाग आणि नगर परिषद यांनी संयुक्त विशेष तपास पथक स्थापन करून मोकाट जनावरांची प्रत्यक्ष गणना, मालकांची पडताळणी, सीसीटीव्ही फुटेजची तपासणी आणि जनावरांच्या हालचालींची नोंद तपासावी, अशी मागणी केली आहे. तसेच दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करून संपूर्ण प्रकरणाचा अहवाल सार्वजनिक करावा, अशीही मागणी होत आहे.

# गणेशोत्सवासाठी मनपाची जय्यत तयारी मंडप परवानगी प्रक्रिया होणार ऑनलाइन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती-**
गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेने जय्यत तयारी सुरू केली असून, यंदा सार्वजनिक गणेश मंडळांची नोंदणी आणि मंडप परवानगी प्रक्रिया ऑनलाइन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत विसर्जन, स्वच्छता, वाहतूक, अग्निसुरक्षा आणि आपत्ती व्यवस्थापनाबाबत सविस्तर नियोजन करण्यात आले.गणेश मंडळांना विविध परवानग्यांसाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, तसेच प्रक्रियेत पारदर्शकता यावी, यासाठी ऑनलाइन प्रणाली विकसित करण्याचे निर्देश आयुक्तांनी संबंधित विभागांना



दिले. ऑनलाइन अर्जामध्ये मंडळाचे नाव, आयोजकांची माहिती, मंडपाचा पत्ता, सुरक्षा व आपत्ती व्यवस्थापनासंबंधी आवश्यक माहिती भरावी लागणार आहे.गणेश विसर्जन व्यवस्थेवरही बैठकीत विशेष भर देण्यात आला. मोठ्या गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी प्रथमेश तलाव येथे आवश्यक व्यवस्था करण्यात येणार असून, छत्री तलाव येथे कृत्रिम तलाव उभारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच घरगुती गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी शहरातील विविध भागांत कृत्रिम तलाव व आर्टिफिशियल टँकची व्यवस्था करण्यात येणार आहे.विसर्जनस्थळी प्रकाश व्यवस्था, स्वच्छता, सुरक्षा, गर्दी नियंत्रण, वैद्यकीय सुविधा आणि आपत्कालीन मदतीची व्यवस्था करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. मंडप उभारणीमुळे वाहतुकीत अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी पोलीस व मनपाच्या संबंधित विभागांनी समन्वयाने नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले.अग्निसुरक्षेच्या दृष्टीने मंडपांतील विद्युत व्यवस्था, आपत्कालीन मार्ग आणि आवश्यक सुरक्षा उपायांची तपासणी केली जाणार आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांसोबतही समन्वय साधण्यात येणार आहे.बैठकीस अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, शिल्पा नाईक यांच्यासह मनपाचे वरिष्ठ अधिकारी, अग्निशमन, आरोग्य, अतिक्रमण, बाजार व परवाना विभागाचे अधिकारी तसेच पोलीस प्रशासनाचे प्रतिनिधी उपस्थित होते.-

# २०१० पूर्वी नियुक्त शिक्षकांना TET सक्तीतून कायमस्वरूपी सूट द्या

## शिक्षक समितीची राज्यव्यापी आंदोलनाची चेतावणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**
२३ ऑगस्ट २०१० पूर्वी सेवेत रुजू झालेल्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा (ढएढ) सक्तीमधून कायमस्वरूपी सूट देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने केली आहे. या मागणीसाठी तमिळनाडूच्या धर्तीवर आगामी हिवाळी अधिवेशनात सर्वपक्षीय ठराव मंजूर करून तो केंद्र सरकारकडे पाठवावा, अशी मागणी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.२०१० पूर्वी नियुक्त झालेले शिक्षक तत्कालीन



शासनमान्य ऊढ.एव. व इ.एव. यांसारख्या आवश्यक पात्रता पूर्ण करून नियमानुसार सेवेत दाखल झाले आहेत. त्यामुळे १० ते ३० वर्षांची सेवा बजावल्यानंतर त्यांच्यावर नव्या पात्रतेची सक्ती पूर्वलक्षी प्रभावाने लादणे अन्यायकारक असल्याची भूमिका समितीने मांडली आहे.ढएढ व उढएढ परीक्षांतील अनिश्चितता, कथित गैरप्रकार, पेपरफुटी आणि परीक्षा पुढे ढकलण्याच्या घटनांमुळे शिक्षकांमध्ये अस्वस्थता असल्याचेही समितीने म्हटले आहे. अनुभवी शिक्षकांना केवळ एका परीक्षेच्या निकषामुळे असुरक्षिततेत ठेवू नये, अशी मागणी करण्यात आली आहे.हिवाळी अधिवेशनात कायमस्वरूपी सूट देण्याचा ठराव मंजूर न झाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी दिला. ही माहिती राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर यांनी दिली.

# राजापेठ ठाण्याच्या हद्दीतून १७ गुन्हेगार तडीपार

## उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांची सराईत गुन्हेगारांवर धडक कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**
स्थानिक राजापेठ पोलिसांनी हद्दीतील १७ सराईत गुन्हेगारांना तर गाडगेनगर पोलिसांनी सहा गुन्हेगारांना जिल्ह्यातून तडीपार केले आहे. यापैकी कोणताही गुन्हेगार शहरात फिरताना दिसताच नागरिकांनी पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.




गणपती व दुर्गादेवी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहर पोलिसांनी सराईत गुन्हेगारांवर धडक कारवाई सुरू केली आहे. शहरातील गुन्हेगारांवर प्रतिबंधक कारवाईसह मकोका आणि तडीपार कारवाईसुद्धा सुरू केली आहे. राजापेठचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगारांचा रेकॉर्ड तयार केला आणि त्यांच्या तडीपारीचा प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठविला होता. वरिष्ठांनी प्रत्येक गुन्हेगाराच्या गुन्ह्याचे स्वरुप व दाखल गुन्हे पाहता काही गुन्हेगारांना एक महिना तर काहींना एक ते दोन वर्षाकरिता शहरासह जिल्ह्यातून तडीपार केले आहे. तडीपारगुन्हेगार शहरात दिसल्यास किंवा तो शहरात लपून कोणत्या ठिकाणी राहत आहे, कोणत्या वाहनाने शहरात येतो, तडीपार कालावधीत तो कोणाच्या संपर्कात आहे, याबाबत कुठलीही माहिती मिळाल्यास ती माहिती पोलिसांना द्यावी, माहिती देणाऱ्या नागरिकाची ओळख गोपनीय ठेवण्यात येईल, असे आवाहन पोलीस प्रशासना मार्फत करण्यात आले आहे.

### ही आहेत तडीपार आरोपी

आदित्य रमेश आमटे (वय २० रा. सरोज कॉलनी), कुशल संजय बोबडे (वय ४० रा. सबनिस प्लॉट), सतिश रामभाऊ पालवे (वय ४३ रा. जेवड नगर), संकेत सुरेश घुगे (वय २१ रा. आदर्शनगर), सागर रामदुलार यादव (वय ३८ रा. हमालपुरा), विक्की उर्फ गणेश मधुकर खडसे (वय २९ रा. केडीयानगर), रोहीत वसंतराव कोरटकर (वय २५ रा चिचफैल), केशव हमेश नारयणी (वय २० रा. मधुसुधन कॉलनी साईनगर), देवा विठठल मडावी (वय २१ रा. जेवडनगर), युवराज उर्फ जय विजय करवाने (वय २५ रा. चिचफेल), अभय नटवर झांझोटे (वय २० रा. सुशीलनगर), भाग्येश त्रंबक जाने (वय २६ रा. भटवाडी), यश सुनिल कटु (वय २४ रा. मेहर बाबा कॉलनी), सुजल पुरुषोत्तम जायभाये (वय २० रा. आदर्शनगर), अभिषेक रमेश डिक्याव (वय २५ रा. पोस्टमन कॉलनी), पंकज राजु गोंडाने (वय ३० रा. चवरेनगर), शुभम राजु बोयत (वय २८ रा. पीकेव्ही कॉलनी साईनगर)

# पाच दिवस उलटले, तरी वाघाची भीती कायम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ मोर्शी –** तालुक्यातील भांबोरा, कवठाळ व परिसरात वाघाच्या वावरामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाघाच्या हल्लयात चरणदास वासुदेवराव विखे यांचा मृत्यू झाला. आज हे घर उघड्यावर आले. घरचा कर्ता माणूस गेल्यामुळे त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. शेतकऱ्याचा मृत्यू होऊनही सलग पाच दिवस उलटले तरी वनविभागाला वाघाचा ठावठिकाणा लागलेला नाही, अशी ओरड ग्रामस्थ करीत आहेत. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार वाटोळा येथे वाघ दिसल्यानंतर वनविभागाला यायला जवळपास एक तास लागला. असे नागरिकांचे म्हणणे आहे. पाऊस नसल्यामुळे शेतात पाय सुद्धा फसत नाहीत. परंतु वाघाला पकडण्यात किंवा त्याचा सुगावा लावण्यात वनविभागाला यश आलेले नाही, असा नागरिकांचा आरोप आहे. त्यामुळे शेतकरी शेतात जाण्यास घाबरत असून जनावरांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.



नागरिकांनी वनविभागाकडे तातडीने पिंजरे लावणे, कॅमेरा ट्रॅप वाढवणे, शोधमोहीम राबवणे आणि गावांमध्ये सतत गस्त ठेवण्याची मागणी केली आहे. वन विभागाची टीम नागरिकांचा फोन गेल्यानंतर त्या परिसरात जाते व पाहणी करून काही वेळ थांबून पुन्हा परत येत, अशी ग्रामस्थांची ओरड आहे.

त्यामुळे या वाघाचा शोध लागत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. वाठोळा येथे वाघ नागरिकांना अगदी गावाजवळ दिसला. त्यानंतर वनविभागाला कळविण्यात आले. तेव्हा वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळावर आले आणि घटनास्थळावरून ड्रोन कॅमेऱ्याने पाहणी केली परंतु त्यांना वाघ दिसला नाही. भांबोरा येथील एका व्यक्तीचा मृत्यू झाला, पुन्हा याच वाघाने दुसऱ्या कोणत्या व्यक्तीचा बळी घेतल्यास फार मोठे नुकसान होईल, त्यामुळे वन विभागाने तातडीने हालचाली करून या वाघाचा बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# गोळीबार करणारे दोघे शिकारी जेरबंद

## शेतमजुराच्या पायाला झाली होती दुखापत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२चिंचोली काळे**
चा.बाजार तालुक्यातील चिंचोली काळे परिसरातील शेतशिवारात शिकारीसाठी गेलेल्या दोन जणांनी बंदुकीतून केलेल्या गोळीबारातील शेतात काम करणाऱ्या व्यक्तीच्या पायाला गोळी लागून तो जखमी झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणी चांदूर बाजार पोलिसांनी तिवसा तालुक्यातील आनंदवाडी येथील दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. चरणसिंग अजितसिंग बावरी (वय ४०) आणि मुन्नासिंग रामसिंग बावरी ( वय ६२, दोघेही रा. आनंदवाडी, ता. तिवसा) अशी पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या संशयितांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रशांत गोवर्धन मोहोड (४५, रा. चिचोली काळे, ता. चांदूर बाजार) हे चिंचोली काळे येथील शेतशिवारात काम करीत असताना दोन अनोळखी शिकारी हरिणाची



शिकार करीत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्याचवेळी शिकाऱ्यांनी छर्ऱ्याच्या बंदुकीतून फायर केले. यातील छर्रे मोहोड यांच्या पायाला लागल्याने ते जखमी झाले होते. या घटनेनंतर पोलिसांनी तपास सुरू केला. मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे संबंधित शिकारी तिवसा परिसरातील आनंदवाडी येथे असल्याचे समोर आले. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, विश्वासात घेऊन चौकशी केल्यानंतर त्यांनी दोघेही डुक्कराच्या शिकारीसाठी चिंचोली काळे परिसरातील शेतशिवारात गेले होते. तेथे डुक्कर दिसल्यानंतर त्याच्यावर फायर केला असता त्यातील एक छर्रा खाली लागून तो छर्रा प्रशांत मोहोड यांच्या पायाला लागल्याचे सांगितल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. दोघांना ताब्यात घेण्यात आले असून या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक पंकज कांबळे करीत आहेत. ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक निकेतम कदम व अपर पोलिस अधीक्षक दत्ता तोटेवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक आधारसिंग सोनाने यांच्या नेतृत्वात पंकज कांबळे, रवींद्र बावणे, आशीष राऊत, ज्ञानेश्वर गवई व वैभव आकोटकर यांच्या पथकाने केली.

# जि.प. मध्ये सहा स्वीकृत सदस्यांची निवड होणार

## जाचक निकषांमुळे इच्छुकांची संख्या घटली; तज्ज्ञांना संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती** गेल्या साडेचार वर्षांपासून प्रशासकराज सुरू असलेल्या जिल्हा परिषदेत निवडणुकांबाबत अद्याप कोणतीही हालचाल नसली, तरी शासनाने स्वीकृत सदस्यांच्या निवडीसाठी अधिसूचना जारी केली आहे. जिल्हा परिषदेची सदस्यसंख्या ५९ असल्याने सहा स्वीकृत सदस्यांची नियुक्ती केली जाणार आहे.स्वीकृत सदस्यांसाठी शासनाने निश्चित केलेले निकष कडक असल्याने




अनेक राजकीय इच्छुक थेट रेसबाहेर पडले आहेत. त्यामुळे विविध क्षेत्रातील अनुभवी आणि जाणकार तज्ज्ञांची निवड होण्याची शक्यता आहे. प्रशासनाचा अनुभव असलेले स्थानिक रहिवासी तसेच किमान पाचवर्षांचा अनुभव असलेले डॉक्टर, प्राध्यापक, शिक्षणतज्ज्ञ, कृषी व जलसंधारण क्षेत्रातील तज्ज्ञ, सहकार क्षेत्रातील व्यक्ती, वकील, अभियंते, समाजसेवक, निवृत्त अधिकारी आणि एनजीओ पदाधिकारी पात्र ठरू शकतात. राजकीय पक्ष, गट किंवा आघाड्यांच्या संख्याबळानुसार योग्य व्यक्तींच्या नावांची शिफारस केली जाईल. सभागृहाची मंजुरी मिळाल्यानंतर निवड झालेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध केली जातील.

# अमरावतीत आमदार रवी राणांची दहीहंडी यंदा साधेपणाने

## नवजात बालकांच्या मृत्यूनंतर मोठा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

अमरावतीचे आमदार रवी राणा यांच्या वतीने दरवर्षी मोठ्या जल्लोषात आणि भव्य स्वरूपात साजरा होणारा दहीहंडी उत्सव यंदा मात्र अत्यंत साधेपणाने साजरा केला जाणार आहे. अमरावतीच्या जिल्हा सामान्य रुग्णालयात एनआयसीयू विभागात लागलेल्या आगीत तीन नवजात बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या हृदयद्रावक घटनेनंतर आमदार रवी राणा यांनी यंदाचा भव्य दहीहंडी महोत्सव रद्द करण्याचा संवेदनशील निर्णय घेतला आहे.दरवर्षी युवा स्वाभिमान पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या या दहीहंडी उत्सवात मोठ्या संख्येने गोविंदा पथके सहभागी होतात. लाखो रुपयांची बक्षिसे, प्रसिद्ध कलाकारांची उपस्थिती, डीजे



आणि मोठ्या प्रमाणात होणारी गर्दी हे या उत्सवाचे प्रमुख आकर्षण असते. मात्र, यंदा तीन निष्पाप नवजात बालकांच्या मृत्यूमुळे संपूर्ण अमरावती जिल्ह्यावर दुःखाचे सावट आहे.याच दुःखात सहभागी होत आमदार रवी राणा यांनी भव्य दहीहंडी, डीजे, मोठी बक्षिसे आणि जल्लोषाचे कार्यक्रम रद्द केले आहेत. मात्र, दहीहंडीची सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरा खंडित होऊ नये, यासाठी अत्यंत साध्या पद्धतीने बालगोपालांच्या हस्ते भगवान श्रीकृष्णाचे पूजन करून दहीहंडी फोडण्यात येणार आहे.यासोबतच यंदाचा उत्सव सामाजिक उपक्रमांना समर्पित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तब्बल ५० लाख रुपयांचा निधी विविध सामाजिक आणि लोककल्याणकारी उपक्रमांसाठी खर्च करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.जिल्हा रुग्णालयातील दुर्दैवी घटनेत मृत्यू झालेल्या नवजात बालकांच्या पालकांना प्रत्येकी दोन लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदत, दिव्यांगांना आवश्यक साहित्य, बेरोजगार युवकांना रोजगाराचे साधन, महिलांना शिलाई मशीन, आरोग्य सेवा, रक्तदान शिबिरे आणि नेत्र तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

**उत्सवापेक्षा माणुसकी मोठी–** हा सामाजिक संदेश देत हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस, महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सोबत झालेल्या चानंतर तसेच माजी खासदार व भाजपा नेत्या नवनीत राणा यांनी पत्राद्वारे केलेल्या विनंतीच्या पार्श्वभूमीवर नवाथे चौक, अमरावतीसह परतवाडा, धारणी, अंजनगाव सुर्जी आणि तिवसा येथील नियोजित दहीहंडी कार्यक्रमही रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# उद्यान विभागातील 'मक्तेदारी'ला बसणार चाप!

## आयुक्त मंगेश गोंदावले यांचे थेट आदेश २०० उद्यानांसाठी लवकरच ई-टेंडरिंग

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२अमरावती**

महानगरपालिकेच्या उद्यान विभागातील ठेक्यांवर वर्षानुवर्षे मोजक्या ठेकेदारांचे असलेले वर्चस्व आता संपुष्टात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सुमारे २०० उद्यानांच्या देखभालीसाठी लवकरच ई-टेंडरिंग प्रक्रिया राबविण्याचे थेट आदेश आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी दिले आहेत. त्यामुळे ठराविक ठेकेदार आणि संबंधित यंत्रणेतील अधिकाऱ्यांचे मनोबल कमी होऊन खुल्या स्पर्धेला चालना मिळणार आहे.एका ठेकेदाराकडे ३०, दुसऱ्याकडे २५, तर तिसऱ्याकडे १५ उद्याने?उद्यान विभागातील कामांच्या वाटपावरून यापूर्वी अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. एका ठेकेदाराकडे तब्बल ३० उद्याने, दुसऱ्याकडे २५, तर तिसऱ्या ठेकेदाराकडे १५ उद्यानांची देखभाल असल्याची चर्चा आहे. त्यामुळे मोजक्याच ठेकेदारांच्या हातात मोठ्या प्रमाणावर कामे



केंद्रित झाल्याचे चित्र दिसून येते.याशिवाय अनेक उद्यानांच्या देखभालीसाठी एकसारखे दर निश्चित असतानाही कामांचे वाटप नेमक्या कोणत्या पद्धतीने होते, याबाबतही पारदर्शकतेचा प्रश्न उपस्थित होत आहे. या संपूर्ण प्रक्रियेची खुली स्पर्धा आणि ई-टेंडरिंगच्या माध्यमातून पुनर्रचना झाल्यास ठेकेदारांच्या मक्तेदारीला आळा बसण्याची शक्यता आहे.बेरोजगार संस्थांना मिळणार संधीई-टेंडरिंगमुळे केवळ मोजक्या ठेकेदारांपुरती मर्यादित राहिलेली कामे खुल्या स्पर्धेत येणार आहेत. त्यामुळे पात्र असलेल्या लहान ठेकेदारांसह बेरोजगार संस्था आणि नव्या संस्थांनाही काम मिळविण्याची संधी निर्माण होणार आहे.आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांच्या या निर्णयामुळे उद्यान विभागातील कामकाजात पारदर्शकता वाढण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. अनेक वर्षांपासून उद्यान विभागात ठराविक ठेकेदारांचे वर्चस्व असल्याच्या चर्चांना आता ई-टेंडरिंगच्या निर्णयामुळे पूर्णविराम मिळण्याची शक्यता आहे.'एकाला' नव्हे, खुल्या स्पर्धेला प्राधान्यआता कोणत्याही एका व्यक्तीला किंवा संस्थेला ठेका दिला जाणार नाही. सुमारे २०० उद्यानांच्या समग्र देखभालीसाठी लवकरच ई-टेंडरिंग करण्यात येईल आणि खुल्या स्पर्धेच्या आधारावर कामे दिली जातील, असे आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी स्पष्ट केले आहे.आयुक्तांच्या या निर्णयाचे बेरोजगार संस्था आणि नव्या उद्योजकांकडून स्वागत होत असून, मक्तेदारीला चाप आणि खुल्या स्पर्धेला संधी दिल्याबद्दल आयुक्तांचे आभार, अशी भावना व्यक्त होत आहे.

# मोर्शीच्या शिरलस शेत शिवारात वाघाचा वावर?



## वासराची शिकार; वनविभागाची घटनास्थळी धाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती** मोर्शी तालुक्यातील शिरलस येथील शेतशिवारात वाघाचा वावर असल्याची शक्यता निर्माण झाली असून, एका वासराची शिकार झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती मिळताच वनविभागाची टीम घटनास्थळी दाखल झाली असून, वाघाच्या उपस्थिती बाबत तपास सुरू करण्यात आला आहे.मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, शिरलस येथील शेतकरी प्रणित मावळे यांच्या शेतात बुधवारी दुपारी सुमारे १२ वाजताच्या दरम्यान ही घटना घडली. शेतशिवारात असलेल्या एका वासरावर अज्ञात वन्यप्राण्याने हल्ला केल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर वासराचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.घटनेची माहिती तत्काळ वनविभागाला देण्यात आली. माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी पोहोचले असून, मृत वासराची पाहणी करण्यासह परिसरात वन्यप्राण्याच्या पाऊलखुणा व इतर पुरावे शोधण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. वासराची शिकार नेमकी वाघानेच केली का, याबाबत वनविभागाकडून अद्याप अधिकृत दुजोरा देण्यात आलेला नाही.शिरलस परिसरात वाघाच्या वावराची चर्चा सुरू असून, शेतकरी व ग्रामस्थांनी सतर्क राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे. विशेषतः शेतशिवारात एकट्याने जाणे टाळावे तसेच वन्यप्राण्याचा संशया स्पद वावर दिसून आल्यास तातडीने वनविभागाशी संपर्क साधावा, असे सांगण्यात आले आहे. वनविभागाच्या तपासा नंतरच वासराच्या मृत्यूमागे वाघाचा हल्ला होता की अन्य कोणत्या वन्य प्राण्याने शिकार केली, हे स्पष्ट होणार आहे. मात्र, या घटनेमुळे मोर्शी तालुक्यातील शेतकरी पुन्हा एकदा धास्तावले असून, वन विभागाच्या पुढील अहवालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जवानांच्या सान्निध्यात फुलला रक्षाबंधनाचा आनंद!

## ऋतायन फाउंडेशनतर्फे अनाथालयातील बालकांसोबत आगळावेगळा रक्षाबंधन सोहळा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२कामठी**

नाती रक्ताची नसली तरी माणुसकीची असतात या भावनेला साकारत ऋतायन फाउंडेशनच्या वतीने आर्मी कॅन्टोन्मेंट, कामठी येथे अनाथालयातील बालकांसोबत रक्षाबंधनाचा आनंदोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

या विशेष उपक्रमामागील उद्देश केवळ रक्षाबंधन साजरे करणे एवढाच नव्हता, तर आई-वडिलांच्या मायेपासून वंचित असलेल्या बालकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणे, त्यांना आपलेपणाची अनुभूती देणे आणि भारतीय जवानांच्या शौर्य, त्याग व राष्ट्रसेवेची ओळख करून देणे हा होता.भारतीय जवानांच्या सान्निध्यात बालकांनी रक्षाबंधन साजरे केले. राखी बांधताना निर्माण झालेला आपुलकीचा, भावनिक आणि आनंददायी संवाद या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले.बालकांसाठी हा दिवस केवळ एका सणाचा नव्हता; तर प्रेम, स्नेह, सुरक्षितता, राष्ट्रभक्ती आणि माणुसकीचा अविस्मरणीय अनुभव देणारा ठरला.

### स्वयंसेवकांची मोलाची साथ

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कनिष्का निनावे, सुमित यादव, आर्यकी सोनटक्के, आर्य नेरकर, कृष्णा वजानी, अद्वैत खोब्रागडे, बुलबुल शंभुवाणी, इरा जनेफळकर, नंदिनी कटकवार, पारस बोदडे, अहसान हक, सार्थक चव्हाण, आनंदी गजापुरे, माही फाळे, वंश जुमडे, रिया भोयर, निशैल वरके, देव धापोडकर, वंशिका भोंडे, साधवी खोटेले, प्रियल खाडे आणि कृपा पाडोळे यांनी स्वयंसेवक म्हणून उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.या सर्व स्वयंसेवकांच्या नियोजन, व्यवस्थापन आणि सक्रिय सहभागामुळे उपक्रम यशस्वीपणे पार पडला.-

# कंत्राटी कर्मचाऱ्यांचा पगार थेट बँक खात्यात जमा करा

## खासदार डॉ. अनिल बोंडे यांची पालकमंत्र्यांकडे मागणी

### ठेकेदारांकडून होणारी आर्थिक कपात व मनमानी थांबवण्याचे निर्देश देण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती** – महानगरपालिका, जिल्हा सामान्य रुग्णालय, स्त्री रुग्णालय, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल तसेच जिल्ह्यातील सर्व नगरपालिका आणि शासकीय संस्थांमध्ये कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना कराराप्रमाणे संपूर्ण वेतन थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावे, अशी मागणी राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी राज्याचे महसूल मंत्री व अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना पत्र पाठवून तातडीने आदेश देण्याची विनंती केली आहे.२६

कंत्राटी कर्मचाऱ्यांचे कंत्राटदारांमार्फत होणारे आर्थिक शोषण थांबवण्यासाठी पीएफ (झऋ), ईएसआयसी (एडखउ) आणि जीएसटी (ऋडढ) ची रक्कम प्रशासनाने स्वतः कपात करून उर्वरित सर्व वेतन कर्मचाऱ्यांच्या खात्यात टाकावे, तर कंत्राटदाराला केवळ त्याचे कमिशन देण्यात यावे, असा महत्त्वाचा प्रस्ताव त्यांनी मांडला आहे.

कंत्राटदारांकडून २० हजार रुपयांऐवजी केवळ ८ हजार रुपये खात्यात टाकले जातात आणि तक्रार केल्यास नोकरीवरून काढून टाकण्याची धमकी दिली जाते. तसेच नवीन ठेकेदार आल्यावर नवीन भरती करून मोठा आर्थिक गैरव्यवहार केला जातो. या सर्व बाबींवर आळा घालण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने निर्देश देऊन जिल्ह्यातील सर्व शासकीय आस्थापनांमध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन थेट बँकेत जमा करण्याची पद्धत लागू करावी, अशी मागणी डॉ. अनिल बोंडे यांनी पत्राद्वारे केली आहे.

# अमरावतीतील आश्रमशाळांच्या शिक्षक भरतीला वेग; २९६ उमेदवारांच्या कागदपत्रांची ३ सप्टेंबरपासून पडताळणी

## ४६८ रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया; ३ ते ५ सप्टेंबरदरम्यान होणार मूळ प्रमाणपत्रांची तपासणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती**

अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या अधिनस्त शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षक संवर्गातील ४६८ रिक्त पदांच्या भरती प्रक्रियेला आता वेग आला आहे. ही भरती प्रक्रिया पवित्र पोर्टलद्वारे राबविण्यात येत असून, मुलाखतीशिवाय निवड प्रक्रियेत २९६ शिफारसप्राप्त उमेदवारांची गुणवत्ता यादी २७ ऑगस्ट २०२६ रोजी पवित्र पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**३ ते ५ सप्टेंबरदरम्यान पडताळणी–** शिफारसप्राप्त उमेदवारांच्या मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांची पडताळणी ३ ते ५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या कार्यालयात करण्यात येणार आहे.

पदनिहाय व माध्यमनिहाय शिफारसप्राप्त उमेदवारांची यादी तसेच कागदपत्र पडताळणीचे सविस्तर वेळापत्रक आदिवासी विकास विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे.

उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळावरील सूचना काळजीपूर्वक वाचून आपल्या पदासाठी निश्चित केलेल्या दिनांक व वेळेनुसार कागदपत्र पडताळणीस उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**मूळ प्रमाणपत्रांसह छायांकित प्रती आणाव्यात–** कागदपत्र पडताळणीसाठी उमेदवारांनी पवित्र पोर्टलवर नोंदविलेल्या माहितीनुसार स्व-प्रमाणपत्र, शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेची मूळ प्रमाणपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भातील लागू प्रमाणपत्रे, अधिवास प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन-क्रिमिनिअर प्रमाणपत्र (लागू असल्यास), टीईटी/सीटीईटी प्रमाणपत्र, दिव्यांगत्व प्रमाणपत्र तसेच इतर आवश्यक कागदपत्रांच्या मूळ प्रती सोबत आणाव्यात.

त्यासोबत प्रत्येक कागदपत्राची एक स्वयंप्रमाणित छायांकित प्रत आणणे आवश्यक आहे.उमेदवारांनी आपल्या पदासाठी निश्चित केलेल्या दिनांक व वेळेनुसार पडताळणीस उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन उपआयुक्त, आदिवासी विकास, अमरावती श्रीकांत धोटे यांनी केले आहे.

# अंजनगाव तालुक्यात उघड्यावर खाद्यविक्रीचा 'जीवघेणा' खेळ!

## अन्नसुरक्षा नियमांची खुलेआम पायमल्ली?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ अंजनगाव सुर्जी**

नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर प्रश्न निर्माण होत असताना संबंधित यंत्रणा नेमकी कोणाची वाट पाहत आहे, असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. अंजनगाव सुर्जी शहरासह तालुक्यातील विविध भागांत उघड्यावर खाद्यपदार्थांची विक्री, खाद्यपदार्थांवर धूळ-माशांचा संभाव्य संपर्क, अस्वच्छ परिसर, अस्वच्छ पाण्याचा वापर आणि खाद्यपदार्थ बांधण्यासाठी जुन्या वृत्तपत्रांचा वापर होत असल्याच्या तक्रारींमुळे अन्नसुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

शहरातील जुने बसस्थानक, नवीन बसस्थानक, पानअटाई, दर्यापूर रोड तसेच या मार्गावरील खाद्यपदार्थांची दुकाने व हॉटेल्स ही नागरिकांच्या मोठ्या वर्दळीची ठिकाणे आहेत. प्रवासी, विद्यार्थी, कामगार आणि ग्रामीण भागातून येणारे नागरिक या ठिकाणी दररोज खाद्यपदार्थ घेतात. त्यामुळे या ठिकाणी स्वच्छता आणि अन्नसुरक्षेचे नियम काटेकोरपणे पाळले जात आहेत का, याची प्रशासनाकडून प्रत्यक्ष तपासणी होणे गरजेचे आहे.

### धूळ, माशा आणि अन्न; आरोग्याशी खेळ?

रस्त्यालगत किंवा उघड्या ठिकाणी ठेवण्यात आलेल्या खाद्यपदार्थांवर धूळ-माती बसण्याची शक्यता असते. त्याचबरोबर माशांचा वावर असल्यास अन्न दूषित होण्याचा धोका वाढू शकतो. खाद्यपदार्थ तयार करणे, साठवणे आणि ग्राहकांना देताना स्वच्छतेचे निकष पाळले जात आहेत का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

### ■'उघड्यावर अन्न, उघड्यावर नियमभंग; प्रशासन मात्र शांत?'

नागरिकांच्या आरोग्यापेक्षा कोणताही व्यवसाय मोठा असू शकत नाही. त्यामुळे प्रशासनाने केवळ पाहणीचा दिखावा न करता प्रत्यक्ष, पारदर्शक आणि कायदेशीर कारवाई करावी, अशी संतप्त भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.उघड्यावर अन्नविक्री, अस्वच्छता आणि संभाव्य नियमभंगाच्या तक्रारींकडे दुर्लक्ष झाले तर उद्या एखादी गंभीर आरोग्यविषयक घटना घडण्याची वाट प्रशासन पाहणार आहे का? असा सवालही नागरिक उपस्थित करीत आहेत.अंजनगाव सुर्जी शहरासह तालुक्यातील खाद्यविक्री केंद्रांची व्यापक तपासणी करून नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी आणि नागरिकांना सुरक्षित व स्वच्छ अन्न मिळेल याची खात्री करावी, अशी मागणी आता अधिक तीव्र होत आहे.



### वृत्तपत्रात खाद्यपदार्थ बांधणे बंद कधी होणार?

खाद्यपदार्थ बांधण्यासाठी किंवा देण्यासाठी जुन्या वृत्तपत्रांचा वापर होत असल्याचे प्रकार आढळत असल्यास संबंधित विभागाने त्याची तातडीने दखल घेणे आवश्यक आहे. अन्नाच्या थेट संपर्कात येणाऱ्या साहित्याबाबत लागू असलेल्या नियमांचे पालन होत आहे की नाही, याची तपासणी करण्याची मागणी होत आहे.

### अन्न व औषध प्रशासनाने आता 'धडक' द्यावी

### ■'आरोग्याशी खेळणाऱ्यांना सोडू नका!'

नागरिकांच्या आरोग्याशी निगडित नियमांचे उल्लंघन आढळल्यास केवळ तोंडी सूचना देऊन भागणार नाही. तुकाराम मुंढे यांच्या शिस्तप्रिय आणि नियमांची कठोर अंमलबजावणी करणाऱ्या प्रशासकीय कार्यशैलीची आठवण करून देणारी धडक मोहीम अंजनगाव सुर्जी शहर व तालुक्यात राबविण्याची गरज निर्माण झाली आहे.तपासणीदरम्यान नियमांचे उल्लंघन सिद्ध झाल्यास, संबंधित दुकानदार, हॉटेल किंवा खाद्यविक्रेत्यांविरुद्ध लागू असलेल्या अन्नसुरक्षा कायदे व नियमांनुसार कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. आवश्यकतेनुसार दंडात्मक कारवाई, नोंदणी किंवा परवान्यांची तपासणी आणि नियमबाह्य आढळणाऱ्या व्यवसायांविरुद्ध कायदेशीर प्रक्रिया राबवावी, अशीही मागणी आहे.

अन्न व औषध प्रशासन विभागाने अंजनगाव सुर्जी शहरासह संपूर्ण तालुक्यात अचानक आणि व्यापक तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांमधून जोर धरत आहे.केवळ कागदोपत्री कारवाई न करता प्रत्यक्ष खाद्यविक्रीच्या ठिकाणी जाऊन खाद्यपदार्थांची गुणवत्ता, पाण्याची स्वच्छता व नमुने, साठवणूक, खाद्यपदार्थ हाताळण्याची पद्धत, परिसराची स्वच्छता नोंदणी/परवाने यांची तपासणी करावी, अशी मागणी आहे.


सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
धन्यवाद वाचकांनो!
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ अमरावती विदर्भ महाराष्ट्र देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वाढला
शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व
राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला
आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :